महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे
२५, जुने सर्किट हाऊस जवळ, राणीचा बाग,
पुणे – ४११००१

दूरध्वनी : ०२०-२६३६२०७१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

क्र.आसंप्रसं/स्पर्धा परीक्षा/२०२४-२५/का.०४/ ३७६१

दिनांक :- १४.१०.२०२४

# जाहीर सूचना

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे संस्थेमार्फत अनुसूचित जमाती या संवर्गातील पात्र लाभार्थी यांच्यासाठी पोलीस/सैन्य या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी दि. ०८.०८.२०२४ रोजी जाहीर सुचना देण्यात आली होती. यामध्ये दिनांक ३१.०८.२०२४ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत मुदत वाढविण्यात आली होती.

**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक –अ आणि एक –ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश याव्यतिरिक्त) नियम व आदेश गृहविभागाकडून दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या अधिसूचनेत (ई) अनुसूचित जमातींसाठी विशेष तरतूद यामध्ये जे उमेदवार आवश्यक पात्रता शर्तीची पूर्तता करतात अशा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना, आवश्यक असलेल्या उंचीमध्ये, ५ सेंटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल. असे नमूद आहे.**

त्यामुळे या सुचनेद्वारे जाहीर करण्यात येते की. अनुसूचित जमाती या संवर्गातील पात्र लाभार्थी यांच्यासाठी पोलीस/सैन्य या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी ज्या उमेदवारांचे उंचीमुळे उपरोक्त कालावधीत अर्ज सादर झालेले नाहीत अशा उमेदवारांसाठी तसेच ज्या उमेदवारांना उपरोक्त कालावधीत अर्ज सादर करता आलेला नाही अशा सर्व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी **दिनांक १४.१०.२०२४ सायं. ०५.०० वा. पासून ते दिनांक १७.१०.२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत** सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांचा सहभाग विचारात घेता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत वाढविण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास ईमेल पत्ता – cevt.policemilitary@gmail.com , मोबाईल क्र. ०८९५६८९४१४०, दूरध्वनी क्र. ०२०-२६३३०८५४ यावर कार्यालयीन वेळेतच संपर्क साधावा. या अनुषंगाने इच्छुक लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**विशेष टीप : दिनांक ०८.०८.२०२४ ते दिनांक ३१.०८.२०२४ या कालावधीत ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. मात्र उपरोक्त अधिनियमात उंचीबाबत नमूद केलेले निकष हे उमेदवाराने निवडलेल्या संस्थेमध्ये प्रवेशाच्या वेळेस कागदपत्रे तपासणी तसेच शारीरिक चाचणी दरम्यान लागू केले जातील.**

( चंचल पाटील )
सहसंचालक